0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) सहाय्यक पोलीस निरीक्षक, नौपाडा पोलिस ठाणे, प्रतिनियुक्ती विशेष पथक, परि. १, ठाणे यांचेकडून दिनांक १४/०३/२०१२ रोजी अहवालासोबत प्राप्त झालेले कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२०/२०१२/जा.१४८ दिनांक १६/०३/२०१२ व २६/०३/२०१२.

३) या कार्यालयाची "अंतरीम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२०/२०१२/जा.१४९ दिनांक १६/०३/२०१२.

४) मे. एस.पी.एन. ट्रान्सपोर्टस व राजपाल तिर्थराज शर्मा यांचे दिनांक २१/०३/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

५) मे. रेक्सम एच.टी.डब्ल्यु. बेवरेज कॅन (इंडिया) लि. यांचे दिनांक १६/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त झालेले निवेदन.

६) सहाय्यक पोलीस निरीक्षक, नौपाडा पोलिस ठाणे, प्रतिनियुक्ती विशेष पथक, परि. १, ठाणे यांचेकडून दिनांक २८/०५/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२०/२०१२/जा. ४०८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २० /०६/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आ दे श

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०८/०२/२०१२ रोजी परिमंडळ-१ चे अवैध धंदे प्रतिबंधक पथकाचे राजेंद्र रामचंद्र निकम पोलिस नाईक बक्कल नंबर ५८८१ हे सहाय्यक पोलिस निरिक्षक अशोक कडलग, पोलिस उपनिरिक्षक पल्लवी गुगळे, पोलिस नाईक/५५३४ थोरात नेमणूक नौपाडा पोलिस ठाणे, पोलिस शिपाई/३०१८ शितोळे नेमणूक मुंब्रा पोलिस ठाणे, पोलिस शिपाई/६३७८ हमरे नेमणूक कळवा पोलिस ठाणे यांच्या समवेत शिळ डायघर पोलिस ठाण्याचे हद्दीत ००:०१ ते ०६:०० वाजेपावेतो खाजगी जीपने अवैध धंदे प्रतिबंधक पेट्रोलिंक करीत असताना सहाय्यक पोलिस

निरिक्षक अशोक कडलग यांना गुप्त बातमीदाराने ०४:३० वाजण्याचे सुमारास माहिती दिली की, खालसा ढाब्याचे मागील मोकळ्या जागेत मुंब्रा-पनवेल रोड, घोटेघर, उत्तरशीव या ठिकाणी भारत पेट्रोलियम कंपनीच्या गॅसने भरलेल्या टँकरमधून अवैधरित्या गॅस छोट्या छोट्या गॅस सिलेंडरमधून भरुन त्यांची अनधिकृतरित्या बाहेर विक्री केली जात आहे. सदर बाबत सहाय्यक पोलिस निरिक्षक अशोक कडलग यांनी अशोक दुधे पोलिस उपआयुक्त, परिमंडळ-१ यांचेशी संपर्क साधून चर्चा केली असता, त्यांनी सदरबाबत कायदेशीर कारवाई करण्याच्या तोंडी आदेश दिले. त्यानंतर दोन पंचांना बरोबर घेऊन वरील सर्व पथक असे ०५:४५ वाजण्याचे सुमारास त्यांचे खाजगी जीपने सदर ठिकाणी रवाना झाले. दोन्ही पंच व वरील पोलिस पथक यांनी सदर खालसा ढाब्याचे मागील मोकळ्या जागेत जावून खात्री केली असता, सदर ढाब्यापासून सुमारे २०० मीटर अंतरावर मागील बाजूस अनेक ट्रक पार्किंग केलेले होते. त्यांच्यामध्येच एक भारत पेट्रोलियम कंपनीचा गॅसचा टँकर उत्तर दिशेकडे तोंड करुन उभा होता. त्याचे जवळच ७-८ इसम उभे होते. सदर टँकरबाबत पंचांना आणि पोलिस पथकाला संशय आल्याने खात्री करण्यासाठी सदर ठिकाणी पथकाने छापा टाकला. त्यावेळी त्या उभ्या असलेल्या इसमांपैकी दोन इसमांना पोलिस पथकाने जागीच पकडले. मात्र उरलेले काही इसम सदर ठिकाणी पार्किंग केलेल्या गाड्यांच्यामधून व पाठीमागील जंगलातून पळून गेले. सदर ठिकाणी मिळालेल्या गुप्त बातमीप्रमाणे टँकरमधून अवैधरित्या एलपीजी गॅस छोट्या गॅस सिलेंडरमधून भरत असल्याचे निदर्शनास आले.

सदर छापा टाकलेल्या ठिकाणची पोलिस पथकाने पंचासमक्ष पाहणी केली असता, एक एल.पी.जी. कंपनीचा गॅस टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ उभा होता. त्याचे मुख्य होलला एक सफेद रंगाचा पाईप, त्यास चालू-बंद करण्यासाठी रेग्युलेटर (कॉक) दोन्ही टोकास चालू स्थितीत असलेले, त्याचे दुसरे टोक एका गॅस सिलेंडरला लावलेले व पहिले टोक टँकरचे मुख्य होलला लावलेले अशा पध्दतीने सदर टँकरमधून सदरच्या सिलेंडरमध्ये अनधिकृतपणे एल.पी.जी. गॅस भरत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर ठिकाणीची पथकाने पंचांसमक्ष पाहणी केली असता, टँकरचे पाठीमागील बाजूस गवताखाली काही गॅसचे सिलेंडर झाकून लपविल्याचे निदर्शनास आले. सदर ठिकाणी सहाय्यक पोलिस निरिक्षक अशोक कडलग यांनी दोन पंचासमक्ष पकडलेल्या दोन इसमांना त्यांची नांवे विचारता त्यांनी त्यांचे नावे १) शिवाजी समरगी यादव, ड्रायव्हर व २) सकलदीप मन्नु यादव, क्लिनर असे असल्याचे सांगितले. सदर दोन इसमांची अंगझडती व जागेच्या पाहणीवरुन खालीलप्रमाणे मिळून आलेल्या वस्तू ताब्यात घेण्यात आल्या.

CONTROLLER OF RATIONING & ... HEAD

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनीं संगणमत करुन घटनास्थळी त्यांचे ताब्यात असलेल्या भारत पेट्रोलियम कंपनीच्या गॅसटँकरमधून गैरकायदेशिरित्या छोट्या सिलेंडरमध्ये भरतांना मिळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे दिसून येत असल्याने संबंधितांविरुध्द, १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ (१) (सी) तसेच २) भा. दं. वि. चे कलम २८५, ४०७ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द शिळडायघर पोलिस ठाणे, ठाणे येथे गु.र.क्र. ‍II ११/२०१२ दिनांक ०८/०२/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | एक सहा टायरचा एल.पी.जी. गॅस टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९, मॉडेल क्र. १६१२, त्यामध्ये एल.पी.जी. गॅस भरलेला, त्यावर एस.पी.एन. ट्रान्सपोर्ट कंपनी घाटकोपर असा लिहिलेला पिवळ्या व सफेद रंगाचा टँकर | १ नग | ७,००,०००/- |
| २ | एक सफेद रंगाचा पाईप, त्यास चालू बंद करण्यासाठी दोन्ही टोकास रेग्युलेटर (कॉक) | - | १००/- |
| ३ | एक हातात धरुन वजन मोजण्याचा वजनकाटा, गोलाकार घड्याळासारखा दिसणारा, हिरव्या पिवळ्या रंगाचा | १ नग | ५००/- |
| ४ | एक रेग्युलेटर गॅसचे टाकीस लावून चालू बंद करण्याचे | १ नग | ५०/- |
| ५ | एक लोखंडी पान्हा | १ नग | २००/- |
| ६ | एक स्क्रु डायव्हर, निळ्या रंगाची मुठ असलेला | १ नग | ५०/- |
| ७ | एक गुलाबी रंगाचे सिल, वापर न झालेले, टँकरच्या मेन होलला लावण्याचे, त्यावर क्रमांक १२०३६१ असलेले, शिवाजी यादवचे पैसे उजव्या खिशात मिळून आलेले | - | - |
| ८ | एक गुलाबी रंगाचे सिल, वापर केलेले, टँकरच्या मेन होलला लावण्याचे, त्यास बारीक तार लावलेली, ती तुटलेली, सदर सिलवर क्र. १२०४७१ असा असून संदरचे सिले हे मेन होलचे खाली जमिनीवर पडलेले | - | - |
| ९ | एकूण २३ गॅस सिलेंडर टाक्या, १९.५ कि.ग्रॅ. क्षमतेच्या, कमर्शिअल वापराच्या | २३ नग | ४६,०००/- |
| | | एकूण | ७,४६,९००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती सहाय्यक पोलीस निरीक्षक, नौपाडा पोलिस ठाणे, प्रतिनियुक्ती विशेष पथक, परि. १, ठाणे यांनी केलेली आहे. सबब, शिळडायघर पोलिस ठाणे, ठाणे येथे गु.र.क्र. II ११/२०१२ दिनांक ०८/०२/२०१२ मध्ये जप्त करण्यात

आलेला उपरोक्त मुद्येमाल शासनजमा का करण्यात येऊ नये, याबाबत वाचावे क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी म्हणून या कार्यालयात दिनांक २१/०३/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

तपासी पोलिस अधिकारी यांनी त्यांच्या वाचावे क्र. १ अन्वये सादर केलेल्या अहवालामध्ये सदर टँकरमधील तसेच गॅस सिलेंडरमधील गॅस हा अति ज्वलनशिल असून सदरचा मुद्देमाल हा शिळडायघर पोलिस ठाणे समोर जप्त करुन ठेवण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी जप्त मुद्देमाल ठेवणे अतिशय धोकादायक आहे. त्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची दाट शक्यता आहे. सबब, जप्त करण्यात आलेले टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ मधील एल.पी.जी. गॅसचा साठा तसेच घटनास्थळी जप्त करण्यात आलेले २३ वाणिज्य वापराचे १९.५ कि.ग्रॅ. क्षमतेचे गॅस सिलेंडर व त्यामधील एल.पी.जी. गॅस ज्वलनशील असल्याने, कोणतीही दुर्घटना होवू नये, याकरीता जप्त मुद्देमालाबाबत नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याच्या पुढील तपासाच्या अधिन राहून वाचावे क्र. ३ अन्वये अंतरीम आदेश पारित करण्यात आले.

दिनांक २१/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. एस.पी.एन. ट्रान्सपोटस तथा टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ चे मालक यशवंत अमृतलाल शेठ तसेच राजपाल तिर्थराम शर्मा हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ४ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुढील सुनावणी दिनांक १०/०४/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १०/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. रेक्सम एच.टी.डब्ल्यु. बेवरेज कॅन (इंडिया) लि. चे सप्लाय चेन मॅनेजर आनंद मुलिक हे उपस्थित राहिले व त्यांनी कंपनीचे लेखी निवेदन पुढील २ ते ३ दिवसात सादर करणार असल्याचे सांगितले. सदर सुनावणीसही इतर आरोपी/अपचारी यांना पुरेशी संधी देऊन देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. तसेच तपासी पोलिस अधिकारीही सदर सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. तद्नंतर टपालामार्फत मे. रेक्सम एच.टी.डब्ल्यु. बेवरेज कॅन (इंडिया) लि. यांनी वाचावे क्र. ५ अन्वये लेखी निवेदन सादर केले.

तद्नंतर जप्त मुद्देमाल ज्वलनशिल असल्याने यापूर्वीच पारीत करण्यात आलेला अंतरीम आदेशानुसार अंमलबजावणी केल्याबाबतचा अहवाल तसेच तपासी पोलिस अधिकारी यांचे गुन्ह्याच्या पुढील तपासाच्या अनुषंगाने लेखी अभिवेदन वाचावे क्र. ६ अन्वये प्राप्त झाले.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**<u>युक्तिवाद</u> :-**

दिनांक २१/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. एस.पी.एन. ट्रान्सपोर्ट कंपनीचे तथा टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ चे मालक यशवंत अमृतलाल शेठ यांनी युक्तीवाद केला की, सदर गॅस टँकर क्र. एमएच-०४-एल-१५६९ हा श्री. राजपाल तिर्थराज शर्मा यांना १ वर्षापूर्वी विकलेला आहे. तिर्थराम शर्मा हे चेंबूर येथे आपल्या परिवारासंहित रहात असून आर्थिक परिस्थिती व रजिस्ट्रेशन पत्त्याचा अभाव या कारणास्तव सदर टँकर आजतागायत ट्रान्सफर केलेला नाही. श्री. तिर्थराज शर्मा यांचे वय ६३ असून त्यांचे ट्रान्सपोर्ट कंपनीमध्ये मागील ४० वर्षापासून वाहन चालकाचे काम करीत आहेत. श्री. शर्मा यांच्या परिवारात २ मुलगे व १ मुलगी (अविवाहित) व पत्नी ही चेंबूर येथे वास्तव्यास आहे. सदर टँकर हे या कुटुबांचे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन आहे. श्री. तिर्थराम हे स्वत: सदर टँकरचे चालक असून मागील ४ महिन्यांपासून तब्येतीच्या कारणास्तव व मुलीच्या लग्नाची बोलणी करणेबाबत जम्मू काश्मिर येथील त्यांच्या मूळ गावी गेले आहेत. सदर टँरकचा खर्च व गृहखर्च चालविण्यासाठी श्री. तिर्थराम शर्मा यांनी पगारदार वाहन चालक नेमूण घराचा व वाहनाचा देखभाल खर्च चालविण्याचे ठरविले. शिवाजी समरगी यादव (वाहन चालक) व क्लिनर सकलदीप मन्नु यादव यांनी सदर परिस्थितीचा गैरफायदा घेऊन गुन्हा करण्याचा प्रयत्न केला. सदर गुन्ह्यातील आरोपी चालक शिवाजी समरगी यादव व क्लिनर सकलदीप मन्नु यादव यांना नौपाडा पोलिस ठाणे येथील सहाय्यक निरिक्षक व अशोक कडलग यांनी तात्काळ कार्यवाही करुन दिनांक ०८/०२/२०१२ रोजी अटक केली आहे. सदरचा टँकर हा रेक्सम एच.टी.डब्ल्यू. बेवरेज कॅन (इंडिया) लि., तळोजा या कंपनीसाठी ६.४६० टन दि.०७/०२/२०१२ रोजी भारत पेट्रालियम कॉर्पोरेशन लि., उरण येथून भरलेला होता. तसेच आपल्याकडील आदेशानुसार सदर टँकरमधील गॅस हा भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., उरण येथे दि.२०/०३/२०१२ रोजी जमा केला असून त्याचे वजन ६.६७० टन आले आहे. कृपया याची नोंद घ्यावी. तरी आपल्या आदेशानुसार योग्य ती कार्यवाही व्हावी व सदर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन असलेला टँकर ताब्यात देण्यासाठी कृपया अनुमती द्यावी, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २१/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित राजपाल तिर्थराम शर्मा यांनी युक्तीवाद केला की, त्याने गॅस टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ हा एस.पी.एन. ट्रान्सपोर्ट कंपनीकडून विकत घेतलेला असून त्याचे वडिल श्री. तिर्थराम शर्मा वय वर्षे ६३ सदर टँकरचे चालक आहेत. तब्येतीच्या कारणास्तव व त्याच्या बहिणीच्या

विवाहासंबंधी ते मागील ४ महिन्यांपासून जम्मू काश्मिर येथील त्यांच्या गावी गेले आहेत. सदरची मालमत्ता ही त्याच्या परिवाराचे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन आहे व ते पूर्णपणे या गॅस टँकरच्या मिळकतीवर व बचतीवर अवलंबून आहेत. तरी त्याच्या परिस्थितीचा सहानभूतीपूर्वक विचार करुन सदर गॅस टँकर आपल्या आदेशानुसार योग्य त्या कार्यवाहीनुसार पुन्हा त्याच्या ताब्यात देण्यात यावा, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

मे. रेक्सम एच.टी.डब्ल्यु. बेवरेज कॅन (इंडिया) लि. यांनी दिनांक १६/०४/२०१२ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, दिनांक १०/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस माननिय संचालक साहेबांच्या आदेशानुसार ते ट्रान्सपोर्टर आणि रेक्समची रेट कॉन्ट्रक्ट कॉपी जोडत आहोत, असे नमूद आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक, नौपाडा पोलिस ठाणे, प्रतिनियुक्ती विशेष पथक, परि. १, ठाणे यांचे दिनांक २८/०५/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवालात, सदर गॅस टँकरमधील असलेला गॅस तसेच सिलेंडरच्या २३ टाक्या या भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., उरण येथे खाली करण्यात आलेला असून गुन्ह्यातील जप्त केलेला एल.पी.जी. गॅस टँकर क्रएमएच-०४-एएल-१५६९ हा शिळ डायघर पोलिस ठाण्यात जमा केला आहे. तरी सदर गॅस टँकरबाबत पुढील आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०८/०२/२०१२ रोजी परिमंडळ-१ चे अवैध धंदे प्रतिबंधक पथकाने शिळ डायघर पोलिस ठाण्याचे हद्दीत खालसा ढाब्याचे मागील मोकळ्या जागेत मुंब्रा-पनवेल रोड, घोटेघर, उत्तरशीव या ठिकाणी भारत पेट्रोलियम कंपनीच्या गॅसने भरलेल्या टँकरमधून अवैधरित्या गॅस छोट्या छोट्या गॅस सिलेंडरमधून भरुन त्यांची अनधिकृतरित्या बाहेर विक्री केली जात असल्याची खालसा ढाब्याचे मागील मोकळ्या जागेत जावून खात्री केली असता, सदर ढाब्यापासून सुमारे २०० मीटर अंतरावर मागील बाजूस अनेक ट्रक पार्किंग केलेले होते. त्यांच्यामध्येच एक भारत पेट्रोलियम कंपनीचा गॅसचा टँकर उत्तर दिशेकडे तोंड करुन उभा होता. त्याचे जवळच ७-८ इसम उभे होते. सदर टँकरबाबत पंचांना आणि पोलिस पथकाला संशय आल्याने खात्री करण्यासाठी सदर ठिकाणी पथकाने छापा टाकला. त्यावेळी त्या उभ्या असलेल्या इसमांपैकी दोन इसमांना पोलिस पथकाने जागीच पकडले. मात्र उरलेले काही इसम सदर ठिकाणी पार्किंग केलेल्या गाड्यांच्यामधून व पाठीमागील जंगलातून पळून गेले. सदर

ठिकाणी मिळालेल्या गुप्त बातमीप्रमाणे टँकरमधून अवैधरित्या एलपीजी गॅस छोट्या गॅस सिलेंडरमधून भरत असल्याचे निदर्शनास आले. सदर छापा टाकलेल्या ठिकाणची पोलिस पथकाने पंचासमक्ष पाहणी केली असता, एक एल.पी.जी. कंपनीचा गॅस टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ उभा होता. त्याचे मुख्य होलला एक सफेद रंगाचा पाईप, त्यास चालू-बंद करण्यासाठी रेग्युलेटर (कॉक) दोन्ही टोकास चालू स्थितीत असलेले, त्याचे दुसरे टोक एका गॅस सिलेंडरला लावलेले व पहिले टोक टँकरचे मुख्य होलला लावलेले अशा पध्दतीने सदर टँकरमधून सदरच्या सिलेंडरमध्ये अनधिकृतपणे एल.पी.जी. गॅस भरत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर ठिकाणीची पथकाने पंचासमक्ष पाहणी केली असता, टँकरचे पाठीमागील बाजूस गवताखाली काही गॅसचे सिलेंडर झाकून लपविल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन एकूण ७,४६,९००/- रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रस्तूत प्रकरणी, पोलिस पथकाने घटनास्थळी टाकलेल्या धाडीत जप्त करण्यात आलेला गॅस टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ या टँकरमधील एल.पी.जी. गॅस अनधिकृतपणे सिलेंडर्समध्ये भरताना सदर टँकरचे चालक शिवाजी समरगी यादव व क्लिनर सकलदिप मन्नू यादव यांना रंगेहाथ पकडले आहे व सदरच्या गैरकृत्याबाबत मे. एस.पी.एन. ट्रान्सपोर्ट कंपनी तथा टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ चे मालक म्हणून उपस्थित यशवंत अमृतलाल शेठ, यांनीही सुनावणीमध्ये केलेल्या खुलाशात कबूल केले आहे. मे. रेक्सम एच.टी.डब्ल्यु. बेवरेज कॅन (इंडिया) लि., तळोजा, तालुका पनवेल या कंपनीने एक्साईस इन्व्हाईस नं. ३४०२९०३८३४ अन्वये मे. बी.पी.सी.एल. या उरण, जिल्हा रायगड येथील तेल कंपनीतून लिक्वीफाईड पेट्रोलियम गॅसचा खरेदी केलेला साठा हा दिनांक ०७/०२/२०१२ रोजी २२:०१ वाजता टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ मध्ये भरुन तो खरेदीदार असलेल्या नमूद कंपनीच्या नियोजित ठिकाणी पुरवठा करण्याची जबाबदारी मे. एस.पी.एन. ट्रान्सपोर्ट तथा टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ चे मालक यांची होती. तथापी, सदर टँकरचे चालक व क्लिनर यांनी बेकायदेशिररित्या खालसा ढाब्याच्या मागील बाजूस, मुंब्रा-पनवेल रोड, उत्तर शिव या ठिकाणी नमूद टँकरमधील गॅसचा साठा हा गॅस पाईप व इतर साहित्याच्या सहाय्याने धोकादायकरित्या गॅस सिलेंडर्समध्ये भरताना पथकास आढळून आले आहे. सदर बाब अत्यंत गंभीर असून टँकरमधील गॅसचा साठा हा अति ज्वलनशिल असल्याने सदर गॅस साठ्याच्या अवैधरित्या होण्याऱ्या हस्तांतरणच्या प्रक्रियेमध्ये काही अनुचित घटना घडण्याची तसेच त्यामुळे मोठ्या प्रमाणावर जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरहू टँकरचे चालक शिवाजी समरगी यादव व क्लिनर सकलदिप मन्नू यादव यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. यावरुन त्यांना काहीही

सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. घटनास्थळी पोलिस पथकाने जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये टँकरमधील गॅसचा साठा हा सिलेंडर्समध्ये भरण्यासाठी लागणारे सर्व साहित्य सिलेंडर्ससह जप्त केले असून यामुळे आरोपी यांचा सिलेंडर्समध्ये अनधिकृतपणे गॅसचा साठा भरुन सदर भरलेले सिलेंडर्स हे काळाबाजाराने विक्री करण्याचा उद्देश सिध्द होत आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी दिनांक १६/०३/२०१२ रोजी पारित करण्यात आलेले अंतरीम आदेश कायम करण्याच्या निष्कर्शाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मे. एस.पी.एन. ट्रान्सपोर्टसचे मालक यशवंत अमृतलाल शेठ यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, ते जप्त जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ चे मालक असल्याचे सांगून त्यांनी सदरचा टँकर सुमारे एक वर्षापूर्वी राजपाल तिर्थराम शर्मा नामे इसमास विकला असल्याचे सांगितले आहे. तिर्थराम शर्मा हे चेंबूर येथे आपल्या परिवारासहित रहात असून आर्थिक परिस्थिती व रजिस्ट्रेशन पत्त्याचा अभाव या कारणास्तव सदर टँकर आजतागायत ट्रान्सफर केलेला नाही, असे सांगितले. तथापी, त्यांनी सुनावणीमध्ये नमूद टँकरचे परिवाहन विभागाकडील नोंदणीकृत प्रमाणपत्र अथवा इतर कागदपत्रे सादर केली नाहीत. तसेच राजपाल तिर्थराम शर्मा यांनी सुनावणीमध्ये केलेल्या खुलाशात, त्याने गॅस टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ हा एस.पी.एन. ट्रान्सपोर्ट कंपनीकडून विकत घेतलेला असून त्याचे वडिल श्री. तिर्थराम शर्मा वय वर्षे ६३ सदर टँकरचे चालक आहेत. तब्येतीच्या कारणास्तव व त्याच्या बहिणीच्या विवाहासंबंधी ते मागील ४ महिन्यांपासून जम्मू काश्मिर येथील त्यांच्या गावी गेले आहेत. सदरची मालमत्ता ही त्याच्या परिवाराचे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन आहे व ते पूर्णपणे या गॅस टँकरच्या मिळकतीवर व बचतीवर अवलंबून आहेत. तरी त्याच्या परिस्थितीचा सहानभूतीपूर्वक विचार करुन सदर गॅस टँकर योग्य त्या कार्यवाहीनुसार पुन्हा त्याच्या ताब्यात देण्यात यावा, अशी विनंती केली आहे. तथापी टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ चे चालक व क्लिनर या आरोपींनी घटनास्थळी दिलेल्या जबाबानुसार, ते अनधिकृतपणे जप्त टँकरमधील गॅसचा साठा सिलेंडर्समध्ये रिफीलींग करीत असल्याचे कबूल केल्याचे दिसून येते. यावरुन आरोपी यांनी जाणीवपूर्वक सदर बेकायदेशिर कृत्य केल्याचे स्पष्ट होते. म्हणजेच मे. एस.पी.एन. ट्रान्सपोर्टस हा वाहतूकदार तथा टँकर मालकाने मे. बी.पी.सी.एल. या तेल कंपनीची विश्वासार्हता गमावल्याचे निषन्न होत असल्याने त्यांनी उपभोक्ता तसेच पर्यायाने शासनाची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. प्रस्तुत प्रकरणी टँकर मालकाच्या अपरोक्ष जरी चालक व क्लिनर याने त्यांचे वाहनाचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब,

जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टँकरचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टँकर त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा टँकरचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टँकरची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, टँकरच्या मालकीबाबत कोणताही कायदेशी पुरावा सादर न केल्याने अशी कार्यवाही करण्यापूर्वी टँकरच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्राप्त झालेल्या प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये शिळडायघर पोलिस ठाणे, ठाणे येथे गु.र.क्र. ाा ११/२०१२ दिनांक ०८/०२/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) या कार्यालयाचे दिनांक १६/०३/२०१२ रोजीचे अंतरिम आदेश कायम करण्यात येत आहे.

२) जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर टँकरच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टँकरचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टँकर त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टँकरच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी. अथवा टँकरचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टँकरची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा टँकर लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

३) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले एक सफेद रंगाचा पाईप त्यास चालू बंद करण्यासाठी दोन्ही टोकास रेग्युलेटर (कॉक), हिरव्या पिवळ्या रंगाचा गोलाकार घड्याळासारखा दिसणारा हातात धरुन वजन मोजण्याचा एक वजनकाटा, गॅसचे टाकीस लावून चालू बंद करण्याचे एक रेग्युलेटर, एक लोखंडी

पान्हा, निळ्या रंगाची मुठ असलेला एक स्क्रु डायव्हर इत्यादी वस्तू शासनजमा करण्यात येत असून सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ चे चालक, शिवाजी समरगी यादव
२) टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ चे क्लिनर, सकलदीप मन्नु यादव
३) टँकर क्र. एमएच-०४-एएल-१५६९ चे मालक
४) मे. एस.पी.एन. ट्रान्सपोर्ट कंपनी, घाटकोपर चे मालक
५) मे. रेक्सम एच.टी.डब्ल्यु. बेवरेज कॅन (इंडिया) लि., तळोजा चे मालक
(सहाय्यक पोलीस निरीक्षक, नौपाडा पोलिस ठाणे, प्रतिनियुक्ती विशेष पथक, परि. १, ठाणे यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नौपाडा पोलिस ठाणे, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) विभागीय व्यवस्थापक, मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
~~४)~~ निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.